# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.07.2025** **वार-सोमवार**

---

**<u>पोलीस आयुक्त</u>**

यंदाचा गणेशोत्सव राज्य उत्सव म्हणून थाटात साजरा केला जाणार आहे; त्यासाठी सर्व उपाययोजना सुरु झाल्या असून त्या संदर्भात विविध बैठका देखील आता सुरु होतील, असं पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितलं. या उत्सवात पोलीस आणि प्रशासनाकडून कोणतेही एकतर्फी निर्बंध लादले जाणार नाहीत; गेल्या वर्षीची परवानगी चालेल, असं ते म्हणाले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आयोजित राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा 2024 च्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. जगद्गुरु डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर, माजी आमदार उल्हास पवार, माजी महापौर अंकुश काकडे, अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, श्री कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, दगडूशेठ गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यावेळी उपस्थित होते.

**<u>रासने</u>**

यंदाचा गणेशोत्सवात राज्य सरकारकडून अनेक कार्यक्रम आणि भरघोस निधीची घोषणा करण्यात आल्याने हा उत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा होणार आहे. पुण्यात गणेशोत्सव 24 तास खुला रहावा, तसंच हा उत्सव निर्बंधमुक्त पार पडावा यासाठी सरकारकडे पाठपुरावा करत असल्याचं आमदार हेमंत रासने यांनी सांगितलं आहे.

**<u>पीक विमा</u>**

राज्य शासनाने प्रधानमंत्री पीक विमा योजनेत बदल केला असून, एक रुपयात असणारी पीक विमा योजना बंद केलीआहे. यंदा खरीप हंगामासाठी नव्याने धोरण आणले असून अर्ज भरण्यासाठी सीएससी विभागास 40 रुपये मानधन दिले जाणार असून शेतकऱ्यांनी हप्त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही शुल्क सीएससी चालकांना नदेण्याचं आवाहन पुणे कृषी विभागाने केलं आहे.

**<u>पुणे मनपा</u>**

पुणे महापालिकेच्या मिळकतकर विभागाने पहिल्या सव्वादोन महिन्यांत तीन हजार 250 कोटी रुपयांच्या संकलनाचं उद्दिष्ट ठेवलं होतं, त्यापैकी 14 शे कोटी रुपयांचं उत्पन्न पालिकेला मिळालं आहे; उर्वरित उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कोणते प्रयत्न केले पाहिजेत, याचा अभ्यास मिळकतकर विभागाने सुरू केला आहे. आठ महिन्यांमध्ये किमान एक लाख मिळकती शोधून करआकारणी करण्याचं उद्दिष्ट मिळकतकर विभागाच्या 28 विभागीय निरीक्षकांना देण्यात आलं आहे.

**<u>पिंपरी चिंचवड</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेने हरित सेतू प्रकल्पाच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या ब्रँड डिझाइन स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. या स्पर्धेचं  प्रथम पारितोषिक प्रज्ज्वल दिंडे यांना, द्वितीय क्रमांकाचं पारितोषिक

रोहित घोडके यांना, आणि तृतीय क्रमांकाचे पारितोषिक अमोल दर्डी आणि शौर्य भारद्वाज यांना मिळालं आहे. हरित सेतू उपक्रमामार्फत महापालिका पादचारी केंद्रित रस्ते, सुसंगत वाहनतळ व्यवस्था, मजबूत सार्वजनिक वाहतूक प्रणाली आणि सुरक्षित चौक यावर भर देत आहे. या स्पर्धेतील विजेत्यांपैकी एका विजेत्याचं डिझाईन हरित सेतू प्रकल्पाचं ब्रँड डिझाईन म्हणून वापरलं जाणार आहे.

**<u>अवयवदात्यांना मानवंदना</u>**

पुणे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीतर्फे आज 12वा 'नमन दिवस' अत्यंत भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. हा विशेष दिवस, अवयवदान करणाऱ्या महान दात्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि त्यांच्या अमूल्य योगदानाचे स्मरण करण्यासाठी आयोजित केला जातो. तसंच अवयवदात्यांच्या कुटुंबीयांनाही मानवंदना देण्यात येते. या वर्षी 70 अवयवदात्यांच्या कुटुंबियांना कर्नल भूषण ओक आणि आरजे शोनाली यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आलं.

**<u>परिचारिकांना नोटीस</u>**

आपल्या विविध मागण्यांसाठी राज्यातील परिचारिकांनी मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन सुरु केलं आहे. पुण्यासह राज्यातील विविध ठिकाणच्या परिचारिकांनी या आंदोलनात सहभाग घेतला आहे. या संपकरी परिचारिकांना शासनाने नोटिसा पाठवण्यास सुरुवात केली आहे. राज्य शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र राज्य शासनाने आंदोलनाची काहीही दखल घेतली नाही. उलट संप करणाऱ्या परिचारिकांना कारवाईच्या नोटिसा पाठवल्या आहेत; त्यामुळे शासनाबद्दल नाराजी वाढली असल्याचं परिचारिका संघटनेच्या राज्य अध्यक्ष डॉ. मनीषा शिंदे यांनी म्हटलं आहे.

**<u>सनदी लेखापाल</u>**

कृत्रिम बुद्धिमतेमुळे सर्वच क्षेत्रात क्रांतिकारी बदल होत असून सनदी लेखापालही अधिक तंत्रज्ञानाभिमुख आणि 'एआय' प्रशिक्षित होत आहेत, असं प्रतिपादन दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडियाचे अध्यक्ष, सनदी लेखापाल चरणज्योत सिंग नंदा यांनी नुकतंच पुण्यात केलं. सनदी लेखापालांसाठीच्या दोन दिवसंचय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते काल बोलत होते.

**<u>पुरस्कार</u>**

एनव्हायर्नमेंटल क्लब ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीनं पर्यावरणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये यावर्षी कोल्हापूरच्या शिरोळ इथल्या श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आप्पासाहेब उर्फ गणपतराव पाटील 'पर्यावरण जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. डॉ. जी डी यादव यांना पर्यावरण भूषण तर डॉ. बालमुकुंद पालीवाल यांना पर्यावरण गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या शुक्रवारी पुण्यात या पुरस्कारांचं वितरण करण्यात येणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज पावसाच्या काही हलक्या सरी बरसल्या. आज किमान तापमान 30 तर किमान तापमान 22 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या आकाश साधारण ढगाळ राहून हलक्या पावसाचा अंदाज आहे, घाट परिसरात मुसळधार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**